संपादकीय
राकेश शंकर गोरे

# भूमाफियांची दांडगाई



भूमाफियांनी आता सगळीकडेच पाय पसरले आहेत. आतापर्यंत अशा माफियांना राजकीय वरदहस्त असायचा, त्याआडून त्यांचे काळे धंदे चालायचे. पण गेल्या काही वर्षांत हे माफियाच राजकारणी बनल्याने त्यांच्यात बेमुर्वतखोरपणा, मुजोरपणा कमालीचा वाढला आहे. पायाभूत सुविधांचा वेगाने होणारा विस्तार, विकासाच्या वाटेने आसपासच्या गावागावांत पाय पसरणारी महानगरे, शहरे यामुळे महाराष्ट्राचे झपाट्याने नागरीकरण होत आहे. त्याबरोबर जमिनींचे भाव गगनाला भिडत आहेत. या विकासाभिमुखतेच्या चेहऱ्याला भूमाफियांची दांडगाई आणि त्यांचे राजकारणी व बिल्डर लॉबीबरोबरचे लागेबांधे काळिमा फासत आहेत.

सचोटीने व्यवहार करणारे बांधकाम व्यावसायिकही अनेक आहेत; परंतु भूमाफियांच्या दांडगाईने हे क्षेत्र ग्रस्त झाल्याचे कटू वास्तव त्यामुळे बदलत नाही. उल्हासनगरमधील हिललाईन पोलिस ठाण्यातच शनिवारी भारतीय जनता पक्षाचे आमदार गणपत गायकवाड व त्यांच्या साथीदारांनी शिवसेनेचे (शिंदे गट) महेश गायकवाड व साथीदारांवर गोळीबार केला. सत्ताधारी आमदाराने केलेल्या गोळीबारामुळे विरोधकांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या राजीनाम्याचे मागणी अस्त्र डागले आहे. तथापि, वरवर राजकीय वाटणाऱ्या या संघर्षाला जमिनीच्या मालकीच्या व्यावसायिक संघर्षाचीच पार्श्वभूमी अधिक आहे. कारण दोन्हीही गायकवाडांमधील भूखंडाचा वाद पोलिस ठाण्यात गेला होता, त्यातून हा प्रकार घडला.

कल्याण लोकसभा मतदारसंघातून भाजपने उमेदवारी करावी, या सातत्याने होणाऱ्या मागणीमागे शिवसेनेचे (शिंदे गट) खासदार व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पुत्र श्रीकांत यांची कोंडी करण्याची व्यूहरचना होती. या मागणीमागे गणपत गायकवाड आहेत; तर महेश गायकवाड शिंदेंची तळी उचलत आहेत. जमिनीचे तंटे टोकाला गेल्याची उदाहरणे मोठ्या प्रमाणावर असली तरी एका सत्ताधारी पक्षाच्या आमदाराने भर पोलिस ठाण्यात बेमुर्वतपणे गोळीबार करण्याची घटना पहिलीच असावी. यामुळे या प्रकरणाची गंभीर दखल घ्यावी लागते.

मुंबईलगतचा मीरा, भाईंदर, कल्याण, डोंबिवली हा पट्टा जितक्या वेगाने विकसित झाला तितक्याच वेगाने या भागाला मुंबई, नवी मुंबईप्रमाणे भूमाफियांचा घट्ट विळखाही पडला. त्याचा परिपाक म्हणून या घटनेकडे पाहावे लागेल. ज्या जागा काही दशकांपूर्वी कवडीमोल होत्या; त्यावर आता कोट्यवधीच्या बोली लागत आहेत. विशेषतः मोक्याचे भूखंड विकसित करून तेथे गगनचुंबी, चकचकीत काचेच्या चित्ताकर्षक इमारती उभारून अगणित माया जमवण्याचा हेतू त्यामागे आहे. याला दुर्दैवाने सरकारी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कर्मचारी, अधिकारीही खतपाणी घालत असल्याच्या घटना घडल्या आहेत. पोलिस दफ्तरातील नोंदी चाळल्या तरी याचा प्रत्यय येईल. न्यायालयासमोरील खटल्यांची संख्या लाखोंनी वाढण्यामागे जमिनीच्या मालकीसाठीचा संघर्ष मूळ असल्याचे निदर्शनाला येते. केवळ मुंबईच नव्हे तर चांद्यापासून बांद्यापर्यंत कुठेही हेच सर्वव्यापी चित्र दिसेल. सुमारे दोन वर्षांपूर्वी विधिमंडळात गोंदियामधील भूखंडमाफियांचा प्रश्न मांडला गेला होता. खासगी, सरकारी जमिनींवरील अतिक्रमण हा तर न सुटणारा तिढा काही ठिकाणी दिसतो. पुणे आणि उपनगरात अशा माफियांनी भूखंड बळकावण्यासाठीची किंवा त्याच्या व्यवहारांना गती नाहीतर अडथळा आणण्यासाठी चालवलेल्या दादागिरीची असंख्य उदाहरणे आहेत. नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगरपासून ते अगदी गावपातळीपर्यंत हेच चित्र दिसते. मुंबईत कोणेएकेकाळी दाऊद इब्राहिमच्या गँगसह तिच्या विरोधकांमध्ये भूमाफियागिरीतून रक्तरंजित स्पर्धा झाली.

मात्र अशा भूमाफियांनी आता सगळीकडेच पाय पसरले आहेत. आतापर्यंत अशा माफियांना राजकीय वरदहस्त असायचा, त्याआडून त्यांचे काळे धंदे चालायचे. पण गेल्या काही वर्षांत हे माफियाच राजकारणी बनल्याने त्यांच्यात बेमुर्वतखोरपणा, मुजोरपणा कमालीचा वाढला आहे, हेच उल्हासनगरमधील घटनेने दाखवून दिले आहे. राजकारणाचे शुद्धीकरण हेच उत्तर आहे, पण ही कडू मात्रा कशी द्यायची हा खरा प्रश्न आहे. महामार्ग, औद्योगिक वसाहत, विमानतळ यांपासून ते विविध प्रकारचे विकासप्रकल्प सरकारने जाहीर करायच्या आधीच त्याची कानकून लागलेले राजकारणी, अधिकारी, ठेकेदार जमिनी खरेदीचा सपाटा लावतात. प्रसंगी सरकारच्या भूसंपादनात त्या देऊन भरघोस मोबदला लाटतात किंवा अशा प्रकल्पाभोवती मोक्याच्या जागा हस्तगत करतात. ज्या जमिनींचे मोल वाढते तिथे त्यांच्या मालकांवर विक्रीसाठी दादागिरी सुरू होते.



# KNOW THESE 5 BENEFITS OF THIS BRIGHT RED COLOUR FRUIT

In the world of nutrition, strawberries have emerged as a powerhouse, earning the well-deserved title of a super food. Packed with essential vitamins, minerals, and antioxidants, strawberries offer a plethora of health benefits that extend beyond their delightful taste. From boosting your immune system to supporting heart health and promoting radiant skin, these vibrant red berries are indeed a super food worth savouring. Whether enjoyed fresh, blended into a smoothie, or added to salads, strawberries are a delicious and nutritious addition to any meal. Embrace the goodness of this super food and let the sweet taste of strawberries enhance both your well-being and your palate. Here are the five incredible benefits that make them a must-add to your daily diet.

**Rich in Antioxidants :** Strawberries are bursting with antioxidants, including anthocyanins, quercetin, and ellagic acid. These compounds play an important role in neutralising free radicals in the body, which are responsible for oxidative stress and cellular damage.

**Boosts Immune System :** This red colour fruit is a potent source of vitamin C, a well-known immune system booster. A single serving of strawberries provides a significant portion of the recommended daily intake of vitamin C, contributing to the production of white blood cells and collagen.

**Supports Heart Health :** The heart-healthy benefits of strawberries are attributed to their high levels of anthocyanins and potassium. Anthocyanins have been linked to a reduced risk of heart disease by improving heart health, reducing blood pressure, and preventing the buildup of cholesterol. Meanwhile, potassium helps regulate blood pressure and maintain cardiovascular health, making strawberries a sweet addition to a heart-friendly diet.

**Aids in Weight Management :** Strawberries are low in calories and high in fiber, making them an excellent choice for those looking to manage their weight. The fiber content promotes a feeling of fullness, reducing overall calorie intake and helping with weight control. Additionally, the natural sweetness of strawberries can satisfy sweet cravings without the need for added sugars, supporting a balanced and healthy diet.

**Enhances Skin Health :** The combination of antioxidants, particularly vitamin C and ellagic acid, makes strawberries a fantastic ally in promoting healthy skin. Vitamin C is crucial for collagen production, contributing to skin elasticity and reducing the appearance of wrinkles. Ellagic acid, on the other hand, helps protect the skin from the harmful effects of UV radiation, potentially preventing skin damage and premature ageing.

# अनेक गंभीर आजारांपासून बचाव करू शकतात तुळशीची पाने, फायदे वाचून व्हाल अवाक्!

आपल्या तुळशीतील औषधी गुणांमुळे तुळशीचा समावेश औषधी वनस्पतींमध्ये करण्यात येतो. तुळशीच्या सेवनाने शरीरात सकारात्मक उर्जा प्रवाहीत होते व मानसिक दृष्ट्या व्यक्ती प्रबळ होण्यास मदत होते. तुळशीच्या पानांचा, मुळांचा, फुलांचा, फांद्यांचा, मंजीरीचा आणि खोडाचा वापर औषधी म्हणून करता येतो. जाणून घेऊयात तुळशीच्या पानांच्या फायद्यांबद्दल...

**ताप** – ताप आल्यावर तुळशीच्या पानांचा रस प्यायल्यानंतर ताप कमी होतो. तसेच तुळशीच्या पानांचा काढाही ताप कमी करण्यास फायदेशीर ठरतो. लहान मुलांना ताप आल्यानंतर तुळशीच्या तेलाने मालिश केल्याने ताप कमी करण्यास मदत होते. तुळशीची पाने कच्ची खाल्याने देखील ताप कमी होण्यास मदत होते.

**दातांचं आरोग्य** – दातदुखी, कमजोर हिरड्या, दातांतून रक्त येणे, दात किडणे यासर्व गोष्टींसाठी औषध म्हणून तुळशीचा उपयोग केला जातो. दररोज 4 ते 5 तुळशीची पाने तोडांत ठेवल्यास चांगला फायदा होतो. आयुवेर्दामध्येही दातांचे आरोग्य राखण्यासाठी तुळस लाभदायी असल्याचे सांगितले आहे.

**तोडांची दुर्गंधी** – तुळशीच्या पानांचा उपयोग आपण मुखवास म्हणूनही करू शकतो. तोंडातून दुर्गंधी येणे, चव नसणे, तोंड कोरडे पडणे यांवर उपाय म्हणून तुळशीच्या पानांचं सेवन करू शकता. तुळशीच्या पानांमधील पोषक तत्व तोंडात लपलेल्या



बॅक्टेरियांना नष्ट करण्यास प्रभावी ठरतात. त्यामुळे तुळशीच्या पानांचं सेवन केल्यावर श्वास घेतल्यास ताजंतवानं वाटतं.

**त्वचेची काळजी** – तुळशीमध्ये मोठ्या प्रमाणावर ॲंटी-ऑक्सिडेंट असतात. त्याचप्रमाणे यात व्हिटमिन ए आणि बी असतात भरपूर असतात. त्यामुळे त्वचेवरील इन्फेक्शने, त्वचेवरील खाज दूर करण्यासाठी तुळशीच्या पानांचा फार उपयोग होतो. तसेच तुळशीची पाने आंघोळीच्या पाण्यात टाकून आंघोळ केल्याने त्वचा टवटवीत होते. तुळशीच्या पानांचा उपयोग चेहऱ्यावरील काळे डाग दूर करण्यासाठीही होतो.

**मधुमेहावर नियंत्रण** – तुळशीमध्ये असलेलं इगेनॉल द्रव्य मधुमेहावर नियंत्रण मिळवण्यासाठी उपयुक्त ठरतं. रोज सकाळी तुळशीची पाने खाल्ल्याने अथवा तुळशीच्या पानांचा रस प्यायल्याने मधुमेहावर नियंत्रण मिळवण्यास मदत होते.

**रोगप्रतिकारक शक्ती वाढते** – शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठीही तुळस गुणकारी मानली जाते. तुळशीमध्ये अनेक गुणकारी तत्वे आढळून येतात. ज्यांमुळे शरिरातील रोगप्रतिकारक शक्ती, प्लेटलेट्स वाढविण्यासाठी मदत होते. तसेच शरिरातील थकवा दूर करण्यासाठीही तुळस उपयुक्त ठरते.

**मेटाबॉलिज्म** – तुळशीची पानं आपल्या पोटासाठी खूप फायदेशीर असतात. यामुळे मेटाबॉलिज्म सिस्टीम दुरुस्त होण्यास मदत होते. या व्यतिरिक्त तुळशीची पानं गॅस एसिडीटीसारख्या डाएजेशन डिसॉर्डरपासूनही आराम मिळवून देतात.

**बॉडी डिटॉक्सीफिकेशन** – तुळशीच्या पानांमध्ये बॉडी डिटॉक्स करण्याची क्षमता असते. याचे गुणकारी तत्व शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत करतात.

**खोकला–सर्दी** – हिवाळ्याच्या दिवसात सर्दी, खोकल्याची समस्या जाणवणं कॉमन आहे. अशा स्थितीत आजारांपासून दूर राहण्यासाठी तुम्ही तुळशीची पानं चघळलीत तर नक्कीच फायदा होईल. तुम्ही काढा किंवा चहामध्ये तुळशीच्या पानांचा वापर करू शकता.

# 'चित्रपटात पाकड्यांकडून गाणं रेकॉर्ड करुन दाखवाच...'; अमेय खोपकरांचा निर्मात्यांना इशारा

पाकिस्तानातील कलाकारांना भारतात काम करण्यावर बंदी घालण्यात आली होती, ती आता मुंबई उच्च न्यायालयाकडून हटवण्यात आली आहे. काही वर्षांपूर्वी पाकिस्तानी कलाकारांना हिंदी सिनेमांचे पार्श्वगायन करण्यास बंदी घातली होती.२०१६मध्ये उरी हल्ल्यानंतर पाकिस्तानी कलाकारांना भारतात काम करण्यास बंदी घालण्यात आली होती. राज्यातील महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे)ने देखील पाकिस्तानी कलाकार आणि गायक यांच्याविरोधात आक्रमक भूमिका घेतली होती. पाकिस्तानी कलाकारांनी भारतात येऊन दाखवाच, असं आव्हान देखील मनसेने दिलं होतं. न्यायालयाने पाकिस्तानी कलाकारांना भारतात काम करण्याची बंदी हटवल्यानंतर मनसेने पुन्हा आक्रमक भूमिका घेतल्याचे पाहायला मिळत आहे. मनसेचे नेते अमेय खोपकर यांनी ट्विट करत भारतातील निमार्ते आणि पाकिस्तानी कलाकारांना इशारा दिला आहे. अमेय खोपकर म्हणाले की, अतिफ अस्लम या पाकड्या गायकाला बॉलीवूड फिल्ममध्ये गाण्यासाठी इथलेच काही निमार्ते पायघड्या घालतायत. विरोध झाला तर फाट्यावर मारण्याची भाषा अरिजीत सिंग करतोय. न्यायालयाने



दिलेल्या निर्णयाच्या बळावर फुरफुरणाऱ्यांची मस्ती आता उतरवावीच लागेल, असा इशारा अमेय खोपकर यांनी दिला. पुन्हा पुन्हा सांगावं लागतंय हेच दुर्दैव आहे, पण तरीही सांगतोच. पाकिस्तानी कलाकार इथे खपवून घेतले जाणार नाहीत म्हणजे नाहीत, हीच मनसेची भूमिका होती, आहे आणि पुढेही राहणार. फक्त बॉलीवूडच नाही तर कोणत्याही भाषेतील चित्रपटात पाकड्यांकडून गाणं रेकॉर्ड करुन दाखवाच. हे चॅलेंज स्वीकारण्याची हिंमत कुणी करु नये, एवढाच सल्ला आत्ता देतोय, असं अमेय खोपकर यांनी म्हटलं आहे.

# रवींद्र महाजनींच्या बायोपिकमध्ये त्यांची भूमिका साकारणार का?, गश्मीर म्हणाला - जर मी...



मराठी सिनेसृष्टीतील हँडसम हंक अशी ओळख मिळवलेला अभिनेता म्हणजे गश्मीर महाजनी. अभिनयाबरोबरच गश्मीर त्याच्या फिटनेसमुळेही चर्चेत असतो. गश्मीरने मराठीबरोबरच हिंदी सिनेसृष्टीतही जम बसवला. त्याने मराठीबरोबरच अनेक हिंदी मालिका आणि सिनेमांमध्येही काम केलं आहे. गश्मीरचा चाहता वर्ग प्रचंड मोठा असून तो सोशल मीडियावरुन चाहत्यांच्या संपर्कात राहण्याचा प्रयत्न करतो. नवीन प्रोजेक्टबरोबरच गश्मीर वैयक्तिक आयुष्यातील अनेक अपडेट्सही चाहत्यांना देत असतो.

अनेकदा गश्मीर इन्स्टाग्रामवर गश्मीर सेशनही घेताना दिसतो. या सेशनमध्ये गश्मीर चाहत्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देतो. नुकतंच गश्मीरने हे सेशन घेतलं होतं. यामध्ये त्याला एका चाहत्याने गश्मीरचे वडील रवींद्र महाजनी यांच्याबद्दल प्रश्न विचारला. 'वडील रवींद्र महाजनींवर बायोपिक आला तर त्यात तुम्ही त्यांची भूमिका साकारणार का?' असा प्रश्न चाहत्याला गश्मीरने विचारला होता. चाहत्याच्या या प्रश्नाचं गश्मीरने उत्तर दिलं. 'जर मी त्या सिनेमाची निर्मिती करत असेन तर...सर्वकाही योग्य पद्धतीने दाखवलं जाईल याची खात्री घेईन', असं उत्तर गश्मीरने दिलं. गश्मीरचे वडील रवींद्र महाजनी हे दिग्गज अभिनेते होते. त्यांनी अभिनयाने एक काळ गाजवला होता. १४ जुलै २०२३ रोजी त्यांचं निधन झालं.

## HEALTH AND SPORTS

### NO SHUBMAN GILL FOR INDIA ON DAY 4 AGAINST ENGLAND AS BCCI DROPS CRUCIAL INJURY UPDATE



**NEW DELHI:** India will be without Shubman Gill on Day 4 of the 2nd Test against England as the BCCI informed of a slight injury picked up by the young opener ahead of the start of play on Monday. Gill hurt his finger while fielding on Day 2 and would not take the field on what could be the final day of the Visakhapatnam Test. "Shubman Gill hurt his right index finger while fielding on Day 2. He won't be taking the field today," the BCCI said in a post via X. While the nature of the injury is not confirmed, the injury isn't expected to be serious as Gill had no problems while batting on Day 3 as he went on to score his 3rd Test century. Surprisingly, there was no mention of any injury by either Gill or through his body language. He looked at ease while batting, en route to scoring an impressive 104 that propelled India's lead to almost 400. Gill's place was taken in the field by Sarfaraz Khan, who earned his maiden India call-up a few days before the 2nd Test. If it does go bad though, Gill's injury could mean a lot worse for India, who are already grappling with the unavailability of Ravindra Jadeja and KL Rahul, nursing injuries of their own. Apparently, Jadeja is out of the series – gone for good – and even though Rahul is likely to return for the Rajkot Test starting February 15, India can really do without another injury concern. It took Gill 11 months to strike form and peel off a century, and India would need him to carry on until Virat Kohli's impending return, which is another mystery in itself.

### SHREYAS IYER MIMICS BEN STOKES'S 'FINGER CELEBRATION' AFTER SENSATIONAL RUN-OUT OF ENGLAND CAPTAIN



**NEW DELHI :** The on-field tension seems to be hitting the peak in the ongoing Test series between India and England. R Ashwin came up with an in-you-face celebration after Jonny Bairstow was dismissed on Day 4 of the 2nd Test in Visakhapatnam while Shreyas Iyer brought out the 'finger celebration' after inspiring a sensational run-out of the England captain on Monday. Shreyas Iyer pointed to his index finger as the television cameras zoomed into him after he caught England captain Ben Stokes napping. The Kolkata Knight Riders captain mimicked the way Ben Stokes celebrated a sensational catch that led to his dismissal on Day 3 of the hard-fought Test in Visakhapatnam. Shreyas Iyer was pumped up as he was in full flight, picking up the ball while fielding at short mid-wicket and hitting the target with precision even as he had one stump to aim. Ben Foakes flicked one to the leg side and set off for a single. However, Stokes was caught napping. The England captain only realised midway that Shreyas Iyer was lightning-quick on the field. As he tried to quicken up and reach the striker's end, Stokes was caught well short of the crease. Captain Rohit Sharma was overjoyed, knowing India got the big wicket of Ben Stokes due to the sharp effort from Shreyas Iyer. The wicket also saw the end of a 10-over defiance and a 26-run partnership between the England captain and Ben Foakes. Stokes's resistance came to an end on 11 runs as the England skipper looked dejected for not being alert enough. The finger celebration became viral on Sunday when Ben Stokes took a sensational catch to dismiss Shreyas Iyer. Stokes ran back from mid-off after Iyer mistimed a delivery from Tom Hartley when he was batting on 29. Stokes kept his eyes on the ball while running backward and dived to complete the catch.

### SEHWAG'S 'JAISWAL-GILL WILL DOMINATE WORLD CRICKET' WARNING FOR OPPOSITIONS HAS A SPECIAL TENDULKAR-GANGULY CONNECTION



**NEW DELHI :** Batter Yashasvi Jaiswal and Shubman Gill, with a double hundred and a century in the 2nd Test against England, have proven that India's next generation of batters are set to take over. Gill has been around for a bit, but with Jaiswal scoring a maiden Test double at just 22 years of age, has emerged as a huge positive for India, who are pushing to level the series at Visakhapatnam. The fact that they are able to do so owes to Gill and Jaiswal, whose knocks allowed India to set England 399 to win. Jaiswal and Gill's knocks captured the attention of former cricketers all around, but Virender Sehwag's post on the young duo takes the cake. The former India opener backed the two 'Under-25' youngsters to 'dominate world cricket for the next 10 years'. And why not? Gill and Jaiswal are tipped to lead India's batting post the transition phase, when the likes of Virat Kohli and Rohit Sharma decide to call it a day, and the way they have started their career, Sehwag's prediction can indeed come true. "Glad to see two youngsters, both under 25 rising to the occasion and standing out. Very likely that these two will dominate world cricket for the next decade and more," posted Sehwag. Incidentally, Jaiswal and Gill's centuries in the Vizag Test have a pretty special connection. The last time two of India's young batters under 25 years of age scored centuries in the same Test was way back in 1996 when Sachin Tendulkar and Sourav Ganguly achieved the same accolade. Tendulkar and Ganguly scored 177 and 136 respectively, also against England at Nottingham. It was Ganguly's only second Test, having made his debut in the previous game at Lord's, where he scored a famous century. Like the former India captain, Jaiswal too scored a century on debut last year against West Indies.

### 6 CANCER-FIGHTING FOODS YOU MUST INCLUDE IN YOUR DAILY DIET



Among a range of factors that raise cancer risk, poor diet and sedentary lifestyle emerge as significant ones in today's times. As we grow more inactive with each passing year, our cancer risk escalates. This highlights the crucial role of healthy diet and regular physical activity in avoiding onset of various malignancies. A well-balanced diet can nourish our body, strengthening our immune system, and providing our body with essential vitamins, minerals and fibre that can have a protective effect against cancer. Many types of cancer can be prevented by adopting a healthy lifestyle. While a nutritious diet doesn't guarantee full protection, but it can certainly aid in reducing cancer risk. "In our quest for a healthier lifestyle, the significance of a well-balanced diet cannot be overstated. While no single food can guarantee immunity against cancer, incorporating certain nutrient-rich options into our daily meals can contribute to a proactive approach in reducing the risk of cancer".

**TOP CANCER-FIGHTING FOODS**

In an interview with HT Digital, Dr Sharma, talks about six cancer-fighting foods that you should consider including in your daily diet:

*1. Cruciferous vegetables :* Embrace the power of cruciferous vegetables such as broccoli, cauliflower, and Brussels sprouts. Packed with antioxidants and phytochemicals, these vegetables have shown promising potential in reducing the risk of various cancers, including breast and prostate cancer.

*2. Berries :* Nature's sweet treats, berries like blueberries, strawberries, and raspberries, are rich in antioxidants and vitamins. These compounds help combat oxidative stress, which is linked to the development of cancer. Enjoy a handful of berries as a snack or add them to your morning cereal for a burst of flavour and health benefits.

*3. Turmeric :* The vibrant spice turmeric contains curcumin, a powerful anti-inflammatory and antioxidant compound. Studies suggest that curcumin may have anticancer properties by inhibiting the growth of cancer cells. Incorporate turmeric into your cooking or consider a turmeric supplement to reap its potential health benefits.

*4. Leafy Greens :* Dark, leafy greens like spinach, kale, and Swiss chard are rich in vitamins, minerals, and antioxidants. These greens provide a nutrient-dense foundation for a healthy diet and may contribute to cancer prevention by supporting overall cellular health.

*5. Fatty Fish :* Omega-3 fatty acids, found in abundance in fatty fish like salmon and mackerel, have been associated with a reduced risk of certain cancers, particularly colorectal cancer. Aim to include fatty fish in your diet at least twice a week to harness the anti-inflammatory and protective properties of omega-3s.

*6. Garlic :* Beyond adding flavour to your dishes, garlic has been studied for its potential cancer-fighting properties. Allicin, a compound found in garlic, has demonstrated anti-cancer effects in various laboratory studies. Include fresh garlic in your meals to not only enhance taste but also to promote health. While these cancer-fighting foods can be beneficial, it's essential to maintain a holistic approach to health, including regular exercise, stress management, and avoiding tobacco and excessive alcohol consumption.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118
Office contact no. 022-26515151, Mob.9892386748 / 9809386748, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com, Legal Adviser: Adv. Aniket Ghanshyam Bhankal, L.L.B., (ठाणे न्याय कक्षेत)

